महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे
विभागीय मंडळ, पुणे.४११००५

MAHARASHTRA STATE BOARD OF SECONDARY & HIGHER SECONDARY EDUCATION, PUNE.411005

| DIVISIONAL CHAIRMAN | DIVISIONAL SECRETARY | E-MAIL - |
|---|---|---|
| 25536722 (OFFICE) | 25536781/82/83, 25536712 (OFFICE) | sscboardpune@gmail.com |


परीक्षा / महत्वाचे

क्र.पु.वि.मं./डी.पी./ 441
पुणे. 411005.
दि. 19/01/2026

प्रति,

**सर्व परिरक्षक**
**इ. 10 वी व इ. 12 वी परीक्षा फेब्रु-मार्च 2026**
**जिल्हा पुणे, अहिल्यानगर व सोलापूर.**

**विषय :- इ. १० वी व इ. १२ वी परीक्षा फेब्रुवारी-मार्च २०२६ साठी रनरची माहिती सादर करणेबाबत...**

**संदर्भ :- क्र.रा.मं/परीक्षा-८/१०२ दि. १२.०१.२०२६ रोजीचे पत्र.**

उपरोक्त विषयी आपणास कळविण्यात येते की, उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ. १२ वी) परीक्षा दि. १०.०२.२०२६ ते १८.०३.२०२६ व माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ. १० वी) परीक्षा दि. २०.०२.२०२६ ते १८.०३.२०२६ या कालावधीत आयोजित करण्यात आली आहे.

सदर परीक्षेच्या कामासाठी गोपनीय साहित्य परिरक्षण स्थळावरुन परीक्षा केंद्रांपर्यंत पोहचविण्यासाठी आपल्या मार्फत रनर ची नियुक्ती करण्यात यावी व रनरची माहिती खाली दिलेल्या तक्त्याप्रमाणे या कार्यालयास सादर करावी.

| अ.क्र | केंद्र क्रमांक | केंद्राचे नाव | सहाय्यक परिरक्षक (रनर) चे नाव | कार्यरत असलेल्या शाळा / क.म.वि चे नाव | हुद्दा | मोबाईल क्रमांक (Android Mobile) |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |

तसेच फेब्रुवारी-मार्च 2026 च्या परीक्षेवेळी इ. 12 वी व इ. 10 वी परीक्षेच्या सर्व परीक्षा केंद्रावर सहाय्यक परिरक्षक (रनर) यांनी परीक्षार्थ्यांना प्रश्नपत्रिकांचे वाटप झाल्यानंतर सदर परीक्षा केंद्रावर शिल्लक राहिलेल्या प्रश्नपत्रिका व गैरहजर (Absent) असलेल्या विद्यार्थ्यांच्या प्रश्नपत्रिका पर्यवेक्षकाकडून तात्काळ जमा करुन घेऊन केंद्रसंचालक व सहाय्यक परिरक्षक (रनर) यांच्या स्वाक्षरीने Block निहाय सीलबंद करुन केंद्रसंचालकाचे कस्टडीमध्ये ठेवत असतानाचे चित्रीकरण करावे. यामध्ये हलगर्जीपणा दिसून आल्यास रनर व केंद्रसंचालक यांना संयुक्तपणे जबाबदार धरले जाईल.

सहाय्यक परिरक्षकाने (रनर) परीक्षा केंद्रावर करावयाची कार्यवाही याबाबतच्या सर्व सुचना या पत्रासोबत देण्यात येत आहे.

MBRaut
**(डॉ. मीनाक्षी राऊत)**
**विभागीय सचिव**
**पुणे विभागीय मंडळ, पुणे-05**

## परिरक्षक (Custodian) यांचेकरीता आदर्श कार्यपध्दती

**पूर्वतयारी :-**

१. एक परीक्षा केंद्रासाठी सहाय्यक परिरक्षक (रनर) यांची नियुक्ती करावी तसेच त्यांची माहिती विहीत नमुन्यात विभागीय मंडळाकडे एकत्रित सादर करण्यात यावी व त्याची एक प्रत परिरक्षक केंद्रावर जतन करण्यात यावी.
२. परिरक्षक तसेच सहाय्यक परिरक्षक (रनर) यांचेकडे स्मार्टफोन असणे आवश्यक आहे.
३. विभागीय मंडळाकडून नेमण्यात आलेल्या सर्व परिरक्षकांनी त्यांचे अधिनस्त असलेल्या सहाय्यक परिरक्षक (रनर) यांचा WhatsApp Group तयार करावा.
४. परिरक्षकाने आपला Gmail चा Email ID नियुक्त केलेल्या सहाय्यक परिरक्षक (रनर) यांना अवगत करणे आवश्यक आहे.
५. परीक्षा केंद्रासाठी नेमण्यात आलेल्या सहाय्यक परिरक्षक (रनर) यांचे दैनंदिन नियोजन करण्यात यावे व त्याची नोंद परिरक्षक कार्यालयाचे दप्तरी जतन करण्यात यावी.

**प्रत्यक्ष अंमलबजावणी :-**

६. सहाय्यक परिरक्षक (रनर) यांनी संबंधित परिरक्षकाकडून गोपनीय साहित्य परीक्षा केंद्रावर पोहोच करण्याकरीता ताब्यात घ्यावे. सदर प्रक्रिया होत असताना गोपनीय साहित्य सीलबंद असल्याची खात्री करण्यासाठी सहाय्यक परिरक्षक (रनर) यांनी व्हीडीओ चित्रीकरण करावे.
७. परिरक्षकाने ठरवून दिलेल्या वेळापत्रकानुसार सहाय्यक परिरक्षक (रनर) यांनी परिरक्षण केंद्र ते मुख्य परीक्षा केंद्रादरम्यानचा प्रवास सुरू करावा. मुख्य परीक्षा केंद्राकडे निघताना सहाय्यक परिरक्षक (रनर) यांनी आपल्या मोबाईल फोनचे Live-Location चालू करून WhatsApp Group वर शेअर करावे.
८. गोपनीय साहित्य प्रत्येक परीक्षा दालनात वाटप करतानाचे व्हीडीओ चित्रीकरण करण्यात यावे.
९. परीक्षा दालनात प्रश्नपत्रिकांचे वाटप पूर्ण झाल्यानंतर अनुपस्थित परीक्षार्थ्यांची प्रश्नपत्रिका व पाकिटात शिल्लक असलेल्या प्रश्नपत्रिका पुन:श्च सीलबंद करून केंद्रसंचालकाचे कस्टडीमध्ये ठेवत असतानाचे चित्रीकरण करण्यात यावे
१०. परीक्षा केंद्रावर गैरप्रकार आढळून आल्यास त्याबाबतची माहिती सहाय्यक परिरक्षक (रनर) यांनी तातडीने परिरक्षकास द्यावी. परिरक्षकाने सदर माहिती पुढील कार्यवाहीसाठी क्षेत्रीय अधिकारी व विभागीय सचिवांना अवगत करावी.

**परिरक्षकाची (Custodian) भूमिका :-**

१. परिरक्षकाने सहाय्यक परिरक्षक (रनर) यांचे Live Location Track करावे.

परिरक्षकाने सहाय्यक परिरक्षक (रनर) यांचे 'Live Location Track' करण्याची कार्यपध्दती :-


- मोबाईल फोनमध्ये WhatsApp Application उघडण्यात यावे.
- तदनंतर परिरक्षकाने तयार केलेला WhatsApp Group उघडावा.
- सहाय्यक परिरक्षक (रनर) यांनी WhatsApp Group वर पाठविलेल्या Map या icon वर click करावे.
- त्यानंतर Google Map किंवा इतर दुसरे कोणतेही GPS App उघडेल. त्यामध्ये संबंधित सहाय्यक परिरक्षक (रनर) यांचे सध्याचे 'Live Location' परिरक्षकास कळू शकेल

७. दुर्गम क्षेत्रातील परीक्षा केंद्रांसाठी नेमलेल्या सहाय्यक परिक्षक (रनर) यांना मोबाईल कनेक्टीव्हीटी नसल्यामुळे Live Location शेअर करण्यास अडचण येत असेल अशा परिस्थितीत संबंधित केंद्रसचालक याना सहाय्यक परिक्षक (रनर) यांचे परीक्षा केंद्रावरील आगमन व प्रस्थान ची वेळेची नोंद घेवून तसे प्रमाणपत्र परिक्षक कार्यालयाकडे देण्यात यावे.


८. परिक्षकाने आपल्या अधिनस्त असलेल्या सर्व सहाय्यक परिक्षक (रनर) यांना सदर कार्यपध्दतीचे प्रशिक्षण द्यावे.

परिक्षकाने सहाय्यक परिक्षक (रनर) यांचे 'Live Location Track' करण्याची कार्यपध्दती :–
(For Android Mobile)

- मोबाईल फोनमध्ये WhatsApp Application उघडण्यात यावे.
- तद्नंतर परिक्षकाने तयार केलेला WhatsApp Group उघडावा.
- सहाय्यक परिक्षक (रनर) यांनी WhatsApp Group वर पाठविलेल्या Map या icon वर click करावे.



- त्यानंतर दोन पर्याय दिसतील त्यापैकी Google Map किंवा इतर दुसरे कोणतेही GPS App पैकी एक पर्याय निवडावा.




- त्यामध्ये संबंधित सहाय्यक परिक्षक (रनर) यांचे सध्याचे 'Live Location' परिक्षकास कळू शकेल.




## परिक्षकाने सहाय्यक परिक्षक (रनर) यांचे 'Live Location Track' करण्याची कार्यपध्दती :-

(For iPhone Mobile)

- मोबाईल फोनमध्ये WhatsApp Application उघडण्यात यावे.
- तद्नंतर परिक्षकाने तयार केलेला WhatsApp Group उघडावा.
- सहाय्यक परिक्षक (रनर) यांनी WhatsApp Group वर पाठविलेल्या Map या Icon वर click करावे.




- त्यानंतर दोन पर्याय दिसतील त्यापैकी Google Map किंवा इतर दुसरे कोणतेही GPS App पैकी एक पर्याय निवडावा.




- त्यामध्ये संबंधित सहाय्यक परिक्षक (रनर) यांचे सध्याचे 'Live Location' परिक्षकास कळू शकेल.



- संबंधित सहाय्यक परिक्षक (रनर) यांचे परिक्षण केंद्रपासूनचे अंतर पाहावयाचे असल्यास पुढीलप्रमाणे पाहता येईल.



## सहाय्यक परिरक्षक (Assistant Custodian / Runner) यांचेकरीता आदर्श कार्यपध्दती

**पुर्वतयारी :–**

१. प्रत्येक परीक्षा केंद्रासाठी सहाय्यक परिरक्षक (रनर) यांची नियुक्ती करावी तसेच त्यांची माहिती विहीत नमुन्यात विभागीय मंडळाकडे एकत्रित सादर करण्यात यावी व त्याची एक प्रत परिरक्षक केंद्रावर जतन करण्यात यावी.

२. परिरक्षक तसेच सहाय्यक परिरक्षक (रनर) यांचेकडे स्मार्टफोन असणे आवश्यक आहे.

३. विभागीय मंडळाकडून नेमण्यात आलेल्या सर्व परिरक्षकांनी त्यांचे अधिनस्त असलेल्या सहाय्यक परिरक्षक (रनर) यांचा WhatsApp Group तयार करावा.

४. परिरक्षकाने आपला Gmai चा Email ID नियुक्त केलेल्या सहाय्यक परिरक्षक (रनर) यांना अवगत करणे आवश्यक आहे.

५. परीक्षा केंद्रासाठी नेमण्यात आलेल्या सहाय्यक परिरक्षक (रनर) यांचे दैनंदिन नियोजन करण्यात यावे व त्याची नोंद परिरक्षक कार्यालयाचे दप्तरी जतन करण्यात यावी.

**प्रत्यक्ष अंमलबजावणी :–**

६. सहाय्यक परिरक्षक (रनर) यांनी संबंधित परिरक्षकाकडून गोपनीय साहित्य परीक्षा केंद्रावर पोहोच करण्याकरीता ताब्यात घ्यावे. सदर प्रक्रिया होत असताना गोपनीय साहित्य सीलबंद असल्याची खात्री करण्यासाठी सहाय्यक परिरक्षक (रनर) यांनी व्हीडीओ चित्रीकरण करावे.

७. परिरक्षकाने ठरवून दिलेल्या वेळापत्रकानुसार सहाय्यक परिरक्षक (रनर) यांनी परिरक्षण केंद्र ते मुख्य परीक्षा केंद्रादरम्यानचा प्रवास सुरू करावा. मुख्य परीक्षा केंद्राकडे निघताना सहाय्यक परिरक्षक (रनर) यांनी आपल्या मोबाईल फोनचे Live Location चालू करून WhatsApp Group वर शेअर करावे.

**Live Location share करण्याची कार्यपध्दती :–**

- मोबाईल फोनमध्ये WhatsApp Application उघडण्यात यावे.
- तद्नंतर परिरक्षकाने तयार केलेला WhatsApp Group उघडावा.
- सदर WhatsApp Group उघडल्यानंतर दिसणा–या स्क्रिनच्या डाव्या बाजूस खाली असलेल्या अधिक (+) किंवा यु पिन (📎) चिन्हावर click करावे.
- उपलब्ध झालेल्या पर्यायामधून 'Location' वर click करावे.
- मोबाईल स्क्रिनवर GPS Map आपोआप उघडेल. सदर स्क्रिनवरील 'Share Live Location' वर परिरक्षरकास सहाय्यक परिरक्षक (रनर) यांचे स्थान WhatsApp Group वर दिसण्यासाठी click करावे.
- सहाय्यक परिरक्षक (रनर) यांचे 'Live Location' पुढील आठ तासासाठी परिरक्षकास कळावे याकरीता या स्क्रिनवरील आठ तासाचा पर्याय निवडण्यात यावा.

८. 'Live Location' शेअर केल्यानंतर परिरक्षक केंद्रापासून परीक्षा केंद्रापर्यंत सपूर्ण प्रवासाचे मोबाईल फोन कॅमे–यातून video recording करावे.

९. परिरक्षण केंद्र ते मुख्य परीक्षा केंद्र या दरम्यानच्या प्रवासचे व्हीडीओ चित्रीकरण सुस्पष्ट तसेच योग्य पध्दतीने व्हावे यासाठी सहाय्यक परिरक्षक (रनर) यांनी आपला मोबाईल फोन योग्य पध्दतीने (खिशात ठेवून अथवा गळयात अडकवून) ठेवावा.

१०. परिरक्षण केंद्र ते मुख्य परीक्षा केंद्र या दरम्यानचा प्रवास पूर्ण झाल्यानंतर परिरक्षण केंद्रावरून आणलेल्या सर्व गोपनीय साहित्याचे मुख्य केंद्रसंचालकाकडे हस्तांतरण करत असताना गोपनीय साहित्य सीलबंद असल्याबाबत व्हीडीओ चित्रीकरण करावे. व्हीडीओ चित्रीकरणामध्ये गोपनीय साहित्याचे पाकिटावर असलेली स्लीप स्पष्ट दिसावी. या वरून दिनांक, सत्र व विषय याची खातरजमा करणे शक्य होईल.

११. परीक्षेची वेळ सुरू होईपर्यंत गोपनीय साहित्य सीलबंद स्वरूपात सुरक्षित ठिकाणी (कपाट/पेटी) ठेवले असल्याचे चित्रीकरण करण्यात यावे.

१२. गोपनीय साहित्य प्रत्येक परीक्षा दालनात वाटप करतानाचे व्हीडीओ चित्रीकरण करण्यात यावे.

१३. दालन पर्यवेक्षकाकडून (Block Supervisor) गोपनीय साहित्याचे सीलबंद पाकिट परीक्षार्थ्यांचे स्वाक्षरीने उघडण्याची किमान एका परीक्षा दालनात कार्यवाही चित्रित करण्यात यावी. प्रश्नपत्रिकेतील कोणताही आशय या वेळी चित्रित होणार नाही याची दक्षता घेण्यात यावी.

१४. परीक्षा दालनात प्रश्नपत्रिकांचे वाटप पूर्ण झाल्यानंतर अनुपस्थित परीक्षार्थ्यांची प्रश्नपत्रिका व पाकिटात शिल्लक असलेल्या प्रश्नपत्रिका पुनःश्च सीलबंद करून केंद्रसंचालकाचे कस्टडीमध्ये ठेवत असतानाचे चित्रीकरण करण्यात यावे.

१५. प्रत्यक्ष पेपर सुरू असताना सहाय्यक परिरक्षक (रनर) यांनी संबंधित परीक्षा केंद्रावर बैठे पथक म्हणून काम करावयाचे आहे. सहाय्यक परिरक्षक (रनर) यांनी केंद्र इमारतीतील परिसराचे, परीक्षा दालनाचे बाहेरून व्हीडीओ चित्रीकरण आवश्यकतेनुसार करावे. जर परीक्षा केंद्रावर बाहय घटकांकडून उपद्रव होत असेल तर त्याचेही व्हीडीओ चित्रीकरण परीक्षा केंद्रातूनच करवे.

१६. परीक्षा केंद्रावर गैरप्रकार आढळून आल्यास त्याबाबतची माहिती तातडीने परिरक्षकास देण्यात यावी. परिरक्षकाने सदर माहिती पुढील कार्यवाहीसाठी क्षेत्रीय अधिकारी व विभागीय सचिवांना अवगत करावी.

१७. परीक्षेची वेळ संपल्यानंतर परीक्षा केंद्रावरील शिल्लक असलेल्या प्रश्नपत्रिकांचे सीलबंद पाकिट व लिखित उत्तरपत्रिकांचे गठ्ठे तसेच इतर साहित्य केंद्रसंचालकाकडून स्विकारून परिरक्षक केंद्रावर पोहोच करण्यासाठी ताब्यात घ्यावे. सदर साहित्य स्विकारत असतानाचे व्हीडीओ चित्रीकरण करण्यात यावे तसेच परीक्षा केंद्र ते परिरक्षण केंद्र या प्रवासादरम्यान 'Live Location' सुरू असेल याची खातरजमा करण्यात यावी.

## Video Recording पाठविण्याची कार्यपध्दती :–

१८. चित्रीकरण करण्यात आलेले व्हीडीओ त्या त्या दिवशी Google Drive वर शेअर करण्यात यावेत.
(याबाबतची कार्यपध्दती सोबत देण्यात आलेली आहे.)

सर्वसामान्य सूचना :-

१. सदर WhatsApp Group वरील संदेश (माहिती) कोणत्याही परिस्थितीत इतरांना पाठवू नये. तसेच परिरक्षकांनी सहाय्यक परिरक्षक (रनर) यांचे शिवाय इतर कोणालाही सदर ग्रुपमध्ये सामील करू नये.

२ वैद्यकीय अथवा इतर कोणत्याही अपवादात्मक कारणास्तव सहाय्यक परिरक्षक (रनर) परीक्षा कालावधीत अनुपस्थित असतील तर त्यांचे ऐवजी ज्या व्यक्तीची नेमणूक करण्यात आली असेल त्यांना सदर ग्रुपमध्ये Add करावे. रजेवर असलेल्या सहाय्यक परिरक्षक (रनर) यांना रजा कालावधीत ग्रुपमधून Remove करावे. रजा उपभोगून कर्तव्यावर पुन्हा रूजू झाल्यांनतर त्यांना परत ग्रुपमध्ये Add करावे तसेच रजाकाळातील नेमलेल्या व्यक्तीस ग्रुपमधून Remove करावे.

३. परिरक्षक व सहाय्यक परिरक्षक (रनर) यांनी सदर WhatsApp Group चा वापर फक्त संदेशाची देवाणघेवाण, परीक्षेसंबंधीची सूचना, Live Location तसेच video recording इ. साठीच करण्यात यावा.

४. सहाय्यक परिरक्षक (रनर) यांनी संबंधित परिरक्षकास निर्धारीत करण्यात आलेल्या वेळेत अहवाल देण्याकरीता ग्रुपवर संपर्क साधावा.


५. परिरक्षक व सहाय्यक परिरक्षक (रनर) यांनी आपले मोबईल फोन पूर्ण चार्ज असावेत, स्वतःच मोबाईल चार्जर सोबत ठेवावा. मोबाईल फोनचा कॅमेरा चालू स्थितीत असवा याबाबत दक्षता घेण्यात यावी.

६. परिरक्षण केंद्र ते मुख्य परीक्षा केंद्र या दरम्यानच्या प्रवासात कसल्याही प्रकारचा विलंब किंवा गैरप्रकार टाळण्यासाठी परिरक्षक आपत्कालीन परिस्थितीत संबंधित सहाय्यक परिरक्षक (रनर) यांचे अचूक स्थानाचा मागोवा घेण्यासाठी Live Location चा वापर करू शकतो. सदर video recording चा वापर भविष्यात एखाद्या घटनेची चौकशी करण्याकरीता होवू शकतो, याची नोंद घेण्यात यावी.


७. दुर्गम क्षेत्रातील परीक्षा केंद्रांसाठी नेमलेल्या सहाय्यक परिरक्षक (रनर) यांना मोबाईल कनेक्टीव्हीटी नसल्यामुळे Live Location शेअर करण्यास अडचण येत असेल अशा परिस्थितीत संबंधित केंद्रसंचालक यांना सहाय्यक परिरक्षक (रनर) यांचे परीक्षा केंद्रावरील आगमन व प्रस्थान ची वेळेची नोंद घेवून तसे प्रमाणपत्र परिरक्षक कार्यालयाकडे देण्यात यावे.

<u>Live Location share करण्याची कार्यपध्दती :-(For Android Mobile)</u>


- मोबाईल फोनमध्ये WhatsApp Application उघडण्यात यावे.
- तद्नंतर परिरक्षकाने तयार केलेला WhatsApp Group उघडवा.
- सदर WhatsApp Group उघडल्यानंतर दिसणा–या स्क्रिनच्या खालील बाजूस मधोमध असलेल्या यु पिन चिन्हावर click करावे.




- उपलब्ध झालेल्या पर्यायामधून 'Location' वर click करावे.




- मोबाईल स्क्रिनवर GPS Map आपोआप उघडेल. सदर स्क्रिनवरील 'Share Live Location' वर परिरक्षरकास सहाय्यक परिरक्षक (रनर) यांचे स्थान WhatsApp Group वर दिसण्यासाठी click करावे.



- सहाय्यक परिरक्षक (रनर) यांचे 'Live Location' पुढील आठ तासासाठी परिरक्षकास कळवे याकरीता या स्क्रिनवरील आठ तासाचा पर्याय निवडण्यात यावा.




- तद्नंतर सहाय्यक परिरक्षक (रनर) यांनी आपले 'Live Location' पुढे शेअर करण्यासाठी 'Send' वर click करावे.




Video Recording पाठविण्याची कार्यपध्दती (For Android Mobile) :–


- मोबाईल फोनमध्ये Google Drive Application उघडण्यात यावे.
- सदर Google Drive Application उघडल्यानंतर दिसणा–या स्क्रिनच्या उजव्या बाजूस खाली असलेल्या अधिक (+) चिन्हावर click करावे.




- उपलब्ध झालेल्या पर्यायामधून 'Folder' वर click करावे.




- पुढील स्क्रिनवर नवीन 'Folder' तयार करून त्याला दिनांकनिहाय नाव देण्यात यावे.
  उदा. २१ फेब्रुवारीचे चित्रीकरणाचे फाईलसाठी 21-02-2023 असे नव देण्यात यावे




- सदर 'Fo der' उघडल्यानंतर दिसणा–या स्क्रिनच्या उजव्या बाजूस खाली असलेल्या अधिक (+) चिन्हावर click करावे.




* उपलब्ध झालेल्या पर्यायामधून 'upload' वर click करावे.




* पुढील स्क्रिनवरून मोबाईलमध्ये असलेला दिनांकनिहाय नाव दिलेली व्हिडीओ फाईल निवडून 'Upload' वर click करावे.
* नवीन तयार झालेल्या दिनांकनिहाय 'Folder' वर click करून पुढील स्क्रिनवरील उजव्या बाजूला वरच्या बाजूस असलेल्या तीन डॉटवर क्लिक करून येणा—या पर्यायापैकी 'Share' हा पर्याय निवडावा.




* फाईल शेअर करण्यासाठी परिरक्षकांचा ई मेल आय डी टाकावा.



* पुढील स्क्रिनमधील Editor हा पर्याय निवडावा.




- Send या बटनवर click करावे.




- उपरोक्त पध्दतीने आपण चित्रित केलेले व्हिडीओ Google Drive च्या माध्यमातून परिरक्षकांकडे पाठविले जातील.

Live Location share करण्याची कार्यपध्दती (For IPhone Mobile):–

- मोबाईल फोनमध्ये WhatsApp Application उघडण्यात यावे.
- तद्नंतर परिरक्षकाने तयार केलेला WhatsApp Group उघडावा.
- सदर WhatsApp Group उघडल्यानंतर दिसणा–या स्क्रिनच्या डाव्या बाजूस खाली असलेल्या अधिक (+) चिन्हावर click करावे.





- उपलब्ध झालेल्या पर्यायामधून 'Location' वर click करावे.





- मोबाईल स्क्रिनवर GPS Map आपोआप उघडेल. सदर स्क्रिनवरील 'Share Live Location' वर परिरक्षरकास सहाय्यक परिरक्षक (रनर) यांचे स्थान WhatsApp Group वर दिसण्यासाठी click करावे.




- सहाय्यक परिरक्षक (रनर) यांचे 'Live Location' पुढील आठ तासासाठी परिरक्षकास कळावे याकरीता या स्क्रिनवरील आठ तासाचा पर्याय निवडण्यात यावा.




- तद्नंतर सहाय्यक परिरक्षक (रनर) यांनी आपले 'Live Location' पुढे शेअर करण्यासाठी 'Send' वर click करावे.




Video Recording पाठविण्याची कार्यपध्दती (For IPhone Mobile) :–

- मोबाईल फोनमध्ये Google Drive Application उघडण्यात यावे.
- सदर Google Drive Application उघडल्यानंतर दिसणा–या स्क्रिनच्या उजव्या बाजूस खाली असलेल्या अधिक (+) चिन्हावर click करावे.




- उपलब्ध झालेल्या पर्यायामधून 'Folder' वर click करावे.





- पुढील स्क्रिनवर नवीन 'Folder' तयार करून त्याला दिनांकन्हिाय नाव देण्यात यावे.


उदा. २१ फेब्रुवारीचे चित्रीकरणाचे फाईलसाठी 21-02-2023 असे नाव देण्यात यावे.




- सदर 'Folder' उघडल्यानंतर दिसणा–या स्क्रिनच्या उजव्या बाजूस खाली असलेल्या अधिक (+) चिन्हावर click करावे.




- उपलब्ध झालेल्या पर्यायामधून 'upload' वर click करावे.




- पुढील स्क्रिनवर 'Photos & Videos' हा पर्याय निवडावा.




- पुढील स्क्रिनवरून मोबाईलमध्ये असलेला दिनांकनिहाय नाव दिलेली व्हिडीओ फाईल निवडून 'Upload' वर click करावे.
- नवीन तयार झालेल्या दिनांकनिहाय 'Folder' वर click करून पुढील स्क्रिनवरील उजव्या बाजूला वरच्या बाजूस असलेल्या तीन डॉटवर क्लिक करून येणा–या पर्यायापैकी 'Copy Link' हा पर्याय निवडावा.




- फाईल शेअर करण्यासाठी परिरक्षकांचा ई मेल आय डी टाकावा.



- पुढील स्क्रिनमधील Editor हा पर्याय निवडावा.



- Send या बटनवर click करावे.



- उपरोक्त पध्दतीने आपण चित्रित केलेले व्हिडीओ Google Drive च्या माध्यमातून परिक्षकांकडे पठविले जातील.